नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ९५ Issue - 95 | वार शुक्रवार दि. २२ ऑगस्ट २०२५ Blow- Friday Date 22 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पावसाळी अधिवेशन गोंधळातच संपले

## संसदेतील कामकाजाची टक्केवारी नीचांकी ४० टक्क्यांच्या खाली राहिली.



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : बरोबर एका महिन्यापूर्वी विरोधकांच्या गदारोळाने सुरू झालेले संसदेचे पावसाळी अधिवेशन गुरूवारी तशाच गदारोळात संपले आणि संसदेतील कामकाजाची टक्केवारी नीचांकी ४० टक्क्यांच्या खाली राहिली. लोकसभेत अगदी अखेरच्या टप्प्यात वंदे मातरम या राष्ट्रीय गीताची वेळ आली तरी विरोधकांची घोषणाबाजी सुरू होती. अखेर विरोधक हौद्यातून परतले त्यानंतर वंदे मातरम आणि अधिवेशन संस्थगित करण्यात आले. विरोधकांनी सभागृहात उपस्थित असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पहात, वोट चोर, वोट चोर अशा घोषणा दिल्या. बिहारमधील मतदारयादी पडताळणीच्या (एसआयआर) मुद्यावरून विरोधी पक्षसदस्यांनी लोकसभा आणि राज्यसभेच्या आत आणि बाहेर सलगपणे गोंधळ घातल्यामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज एकही दिवस पूर्ण चालू शकले नाही. लोकसभेची उत्पादकता सरासरी केवळ ३१ तास टक्के तर राज्यसभेत जेमतेम ३९ टक्के होती. एकही दिवस पूर्ण न चाललेला प्रश्नोत्तर तास आणि शून्य प्रहराचे कामकाजही या गोंधळात वाहून गेले.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस होता. पावसाळी अधिवेशन यावेळी केवळ गोंधळांसाठी चर्चेत राहीलं. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये केवळ गोंधळच बघायला मिळालं. त्यामुळे गोंधळात सुरु झालेलं अधिवेशन शेवटच्या क्षणी गोंधळातच संपलं.

# अक्कलकोट तालुक्यातील आश्रम शाळांमध्ये अनागोंदी कारभार; अनेक शाळेतील विद्यार्थी उपाशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**अक्कलकोट/महेश गायकवाड**

अक्कलकोट तालुक्यातील अनेक आश्रम शाळांमध्ये अनागोंदी कारभार सुरू असून अनेक शाळेतील विद्यार्थी उपाशी अन्न पाण्याविना उपाशी राहत असल्याचा धक्कादायक प्रकार महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने केलेल्या पाहणी मध्ये आढळून आला असून यामुळे कोन्हाळी येथील आश्रम शाळेचे मुख्याध्यापक हडपद यांना निलंबित करण्यात आले असून या आश्रम शाळेची मान्यता रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत यामुळे सोलापुर जिल्ह्यात राजकारणी मंडळी मार्फत चालविल्या जाणाऱ्या आश्रम शाळा चालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे

अनेक आश्रम शाळांमध्ये बोगस विद्यार्थी असून कर्नाटक गोवा आंध्रप्रदेश आणि मध्यप्रदेश येथील तसेच इतर राज्यातील विद्यार्थी या आश्रम शाळांमध्ये शिक्षण घेत असल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आले आहे.

अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी आणि साफळे येथील आश्रम शाळांमध्ये



मोठा अनागोंदी कारभार सुरू असून अक्कलकोट तालुक्यातील साफळे येथील महादेव काशीराया पाटील आश्रम शाळेत विद्यार्थ्यांचा अभ्यास घेताना आ. तथा महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे अध्यक्ष सुहास कांदे आदी नी भेट देऊन पाहणी केली यामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत. कोन्हाळी येथील आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांच्या निलंबनाचे आदेश काढण्यात आले असून विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या भेटीत त्रुटी उघड झाल्या आहेत.

महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी आणि साफळे येथील आश्रम शाळेस भेटी दिल्या. यावेळी त्यांना शाळेत भौतिक सुविधांचा अभाव, शैक्षणिक गुणवत्ता नसल्याने दिसले. त्यामुळे समितीने कोन्हाळी आश्रम शाळेचे मुख्याध्यापक सिद्रमप्पा हडपद यांना निलंबित करण्याचे आदेश दिले, तसेच साफळे आश्रमशाळेवर प्रशासक नेमण्याचा आदेश दिला.

> अक्कलकोट तालुक्यातील दोन आश्रम शाळांना भेटी दिल्या. शाळेत भौतिक सुविधांचा अभाव, विद्यार्थी अभ्यासात कच्चे दिसून आले. त्यामुळे कोन्हाळी आश्रम शाळा मुख्याध्यापकांच्या निलंबनाचे आदेश दिले. साफळे येथील आश्रम शाळेवर प्रशासक नेमण्याचा आदेश दिला.
>
> **– आ. सुहास कांदे, अध्यक्ष, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती**

समिती मंगळवार (दि. १९) ते गुरुवार (दि. २१) या दरम्यान सोलापूर जिल्हा दौर्यावर आहे. समिती प्रमुख आ. सुहास कांदे यांनी मंगळवारी सकाळी सोलापूरच्या शासकीय विश्रामगृहात अधिकार्यांची बैठक घेतली. त्यानंतर समितीने अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी येथील (कै.) पशुराम जाधव आश्रम शाळेला भेट दिली. तेव्हा याठिकाणी भौतिक सुविधांचा अभाव, अनेक विद्यार्थी अभ्यासात कच्चे तसेच शैक्षणिक गुणवत्ता फारच घसरल्याचे कारण देत मुख्याध्यापक सिद्रमप्पा हडपद यांना निलंबित करण्याचे आदेश दिले.

### नागनहाळी येथील आश्रम शाळे मध्ये मोठ्या प्रमाणात अनागोंदी कारभार, चौकशीची मागणी

**अक्कलकोट पासून जवळच असलेल्या नागनहाळी येथील आश्रम शाळे मध्ये मोठ्या प्रमाणात अनागोंदी कारभार सुरू असून अनेक कर्मचाऱ्यांकडून भरती करून घेताना जवळपास मोठया प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याचे चर्चा चालू असून सदर आश्रम शाळेचे चौकशी कधी करण्यात येईल त्या ठिकाणचे विविध कारभाराचे चौकशी होईल का असे अक्कलकोट मध्ये सध्या चर्चा चालू आहे.**

यानंतर समितीने साफळे येथील महादेव काशीराया पाटील आश्रम शाळेस भेट दिली. याठिकाणीही पाहणीत अनेक त्रुटी आढळल्याने शाळेवर प्रशासक नेमण्याचे आदेश समिती प्रमुखांनी दिला.यावेळी महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे सदस्य आ. उमेश यावलकर, आ. देवेंद्र कोठे, आ. प्रवीण स्वामी, आ. अनिल मांगुळकर, आ. अमोल मिटकरी, आ. धीरज लिंगाडे उपस्थित होते.

# डीजीसीए यांच्याकडून स्टार एअरला सोलापूर ते मुंबई विमान सेवा सुरू करण्यास परवानगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, दिनांक २१:- सोलापूरचे सर्वसामान्य नागरिक, उद्योजक, व्यापारी आणि लोकप्रतिनिधी यांची दीर्घ कालावधीपासून प्रलंबित असलेली सोलापूर ते मुंबई विमानसेवेची मागणी माहे सप्टेंबर २०२५ अखेरपर्यंत पूर्ण होत आहे. डीजीसीए कडून स्टार एअरला सोलापूर ते मुंबई विमान सेवा सुरू करण्याची परवानगी मिळालेली आहे. तसेच महाराष्ट्र एअरपोर्ट ऑथॉरिटी यांच्याशीही स्टार एअर चा करार झालेला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

महाराष्ट्र एअरपोर्ट ऑथॉरिटीचा स्टार एअर शी करार झाल्याने सोलापूर ते मुंबई विमान सेवा लवकरच सुरू होत आहे. स्टार एअर लवकरच तिकीट विक्रीला सुरुवात करून साधारणतः सप्टेंबर २०२५ अखेरपर्यंत सोलापूरहून मुंबईला पहिले प्रवासी विमानाचे उड्डाण होईल. ही विमान सेवा सुरू झाल्यास सोलापूरचा औद्योगिक, व्यापारी, पर्यटन व शैक्षणिक विकास होण्यास मोठा प्रमाणावर चालना मिळणार आहे.

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद; सोलापूर ते मुंबई प्रवासी विमान सेवा सप्टेंबर २०२५ अखेरपर्यंत सुरू होणार

राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने नुकताच मंत्रिमंडळ बैठकीमध्ये उडान योजनेअंतर्गत १४ कोटीची व्हायाबिलिटी गॅप फडिंगची तरतुद करुन सोलापूर-पुणे-मुंबई विमान-सेवा सुरु करण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे.

**पहिल्या टप्प्यात राज्यात ३४५ पाळणा केंद्रे सुरू होणार** — **ना. तटकरेंच्या मार्गदर्शनाखाली योजना राबविली जाणार**

# नोकरदार महिलांच्या मुलांसाठी महाराष्ट्र सरकार पाळणा केंद्र उभारणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील नोकरदार महिलांच्या जीवनाला नवी ताकद देणारी, त्यांच्या मुलांसाठी सुरक्षित आणि पोषणयुक्त वातावरण निर्माण करणारी पाळणा योजना महाराष्ट्रात सुरु होत आहे. महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना राबविली जाणार आहे. नोकरदार मातांच्या मुलांच्या संगोपनाची मोठी जबाबदारी आता शासन उचलणार आहे. पहिल्या टप्प्यात राज्यात ३४५ पाळणा केंद्रे सुरू होणार आहेत. यासाठी मिशन शक्ती अंतर्गत केंद्र आणि राज्य शासन अनुक्रमे ६०:४० या हिश्शाने निधी उपलब्ध करून देणार आहे. केंद्र शासनाने २९ फेब्रुवारी २०२४ रोजी या योजनेस मान्यता दिली आहे. राज्य शासनाच्या १३ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या निर्णयानुसार या योजनेची अंमलबजावणी होणार आहे.

योजनेची वैशिष्ट्ये : नोकरदार मातांच्या ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील



मुलांसाठी सुरक्षित देखभाल व डे-केअर सुविधा.

३ वर्षाखालील मुलांसाठी पूर्व उद्दीपन तर ३ ते ६ वर्षांच्या मुलांसाठी पूर्व शालेय शिक्षण.

मुलांसाठी सकस आहार - सकाळचा नाश्ता, दुपारचे गरम जेवण आणि संध्याकाळचा पौष्टिक नाश्ता (दूध/अंडी/केळी).

पूरक पोषण आहार, आरोग्य तपासणी, लसीकरण, वाढीचे नियमित निरीक्षण.

वीज, पाणी, बालस्नेही शौचालय आदी सर्व मूलभूत सोयीसुविधांसह मुलांसाठी सुरक्षित वातावरण.

कार्यपद्धती :

महिन्यातील २६ दिवस व रोज ७.५ तास पाळणा सुरु राहील.

एका पाळण्यात जास्तीत जास्त २५ मुलांची व्यवस्था.

प्रशिक्षित सेविका (किमान बारावी उत्तीर्ण) व मदतनीस (किमान दहावी उत्तीर्ण) यांची नेमणूक.

वयोमर्यादा २० ते ४५ वर्षे, भरती प्रक्रियेत स्थानिक उमेदवारांना प्राधान्य.

जिल्हास्तरीय समितीमार्फत पारदर्शक निवड प्रक्रिया.

मानधन / भत्ते :

पाळणा सेविका - रु. ५५००

पाळणा मदतनीस - रु. ३०००

अंगणवाडी सेविका भत्ता - रु. १५००, अंगणवाडी मदतनीस भत्ता - रु. ७५०

नोकरदार मातांच्या मुलांना आता सुरक्षित, शिक्षणाभिमुख आणि पोषणयुक्त वातावरण मिळणार आहे. या योजनेमुळे मातांना रोजगाराच्या संधी साधता येतील. तर मुलांना बालस्नेही संगोपनाची नवी दिशा मिळेल. ही योजना खऱ्या अर्थाने नोकरदार महिलांच्या सबलीकरणाकडे आणि बालकांच्या विकासाकडे नेणारे ऐतिहासिक पाऊल ठरेल. ही योजना केवळ एक शासकीय उपक्रम नसून प्रत्येक आईसाठी दिलासा आणि प्रत्येक बालकासाठी भविष्याची हमी आहे, अशी प्रतिक्रिया आदिती तटकरे यांनी दिली.

# सरकारी नोकरदारांना खुशखबर, पाच दिवस आधीच पगार मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील शासकिय अधिकारी, कर्मचारी तसेच निवृत्ती वेतनधारक यांच्यासाठी शासनाने खुशखबर दिली आहे. गणेशोत्सव सणाचा उत्साह आणि गणेशोत्सवाची धूम लक्षात घेता ऑगस्ट महिन्याचा पगार ५ दिवस आधीच बँक खात्यात जमा केला जाणार आहे. गणेशोत्सवाच्या (त्र्यूपशीर्हें-ेर्री) काळात आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांना (एश्रिूशशी) त्यांचे ऑगस्ट महिन्याचे वेतन २६ ऑगस्ट रोजीच देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे, साहजिकच सरकारी नोकरदारांचा गणेशोत्सावाचा आनंद द्विगुणीत झाला आहे.

राज्य सरकारकडून शासन निर्णय काढून १ सप्टेंबर रोजी होणारे कर्मचारी व अधिकार्यांचे वेतन २६ ऑगस्ट रोजी देण्यास सरकारकडून मान्यता देण्यात आली आहे. जिल्ह परिषद, मान्यता प्राप्त व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था, अकृषि विद्यापीठे/ कृषी विद्यापीठे व त्यांच्या संलग्न अशासकीय महाविद्यालयांचे



अधिकारी व कर्मचारी तसेच निवृत वेतनधारकांन / कुटुंब निवृत वेतन धारक यांनाही हा निर्णय लागू राहणार आहे. त्यामुळे, या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाला तब्बल ५ दिवस आधीच आपला पगार मिळणार आहे. त्यामुळे, गणेशोत्सव काळाती खर्चासाठी खिसा गरम आणि हात ढिला होणार आहे. दरम्यान, गणेशोत्सवात बाप्पांच्या आगमनाची आतुरता घरोघरी पाहायला मिळते, त्यासाठी मंडप सजावट ते गोडधोड पदार्थांची रेलचेल असते. अधिक खर्च करत भाविक सेलिब्रेशन करतात. त्यामुळेच, सरकारने ५ दिवस आधीच पगार देण्याचा निर्णय घेतला आहे.

आगामी गणेशोत्सवासाठी गणेश मंडळांनी गणेश भक्तांसाठी आनंदाची बातमी आहे. गणेशोत्सव काळात गणेश मंडळांना रात्री बारा वाजेपर्यंत देखावे दाखवण्यासाठी शेवटचे पाच दिवस दिले जाणार असल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी कराड येथे दिली आहे. याबाबतचा आदेश लवकरच मुख्यमंत्री जाहीर करणार आहेत, असेही ते म्हणाले.

कोकणात जाणाऱ्या भाविकांना टोलमाफी

यंदाच्या गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत मुंबई-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील टोल नाक्यांवर गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या वाहनांना आणि एसटी बसेसना टोलमाफी मिळणार आहे. त्यासाठी गणेशोत्सव २०२५ - कोकण दर्शन या नावाचे विशेष टोलमाफी पास देण्यात येणार असून त्यावर वाहन क्रमांक व वाहन मालकाची माहिती नोंदवली जाईल.

# सोलापूर आणि सातारा जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यासाठी मंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्ली मध्ये घेतल्या विविध केंद्रीय मंत्र्यांच्या महत्त्वपूर्ण भेटी

## पालकमंत्री जयकुमार गोरे हे दिल्ली दौऱ्यावर





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्राचे पंचायत राज व ग्रामविकास मंत्री आणि सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे आज दिल्ली दौऱ्यावर आले आहेत. त्यांनी सोलापूर आणि सातारा जिल्ह्याच्या महत्त्वपूर्ण विषयासंदर्भात विविध केंद्रीय मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन चर्चा केली.

मंत्री श्री गोरे यांनी केंद्रीय रस्ते व वाहतूक आणि मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन जिल्ह्यातील पालखी मार्गामधील अडथळे दूर करावेत तसेच फलटण ते पुणे हा महामार्ग लवकरात लवकर पूर्ण करावा अशी विनंती केली.

**जिहे-कठापूर लिफ्ट सिंचन योजनेसाठी केंद्रीय पाणी आयोगाशी चर्चा**

सातारा जिल्ह्यातील माण, खटाव, कोरेगाव आणि सातारा तालुक्यांतील दुष्काळग्रस्त गावांना सिंचन सुविधा पुरवण्यासाठी गोरे यांनी गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार जिहे-कठापूर लिफ्ट सिंचन योजनेच्या टप्पा-दोनच्या विस्ताराला गती देण्याच्या उद्देशाने केंद्रीय पाणी आयोगाचे अध्यक्ष अतुल जैन यांची सेवा भवन येथे भेट घेतली. या वेळी त्यांनी तांत्रिक सल्लागार समिती (TAC) मंजुरीसाठी औपचारिक निवेदन सादर केले. ही योजना १७६ गावांना लाभ देणारी असून, ६.३३२ टीएमसी पाण्याचा वापर करून ६०,४३७ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळेल. यामुळे शेतकऱ्यांचे सामाजिक-आर्थिक जीवनमान सुधारेल आणि स्थलांतर कमी होण्यास मदत होईल. या प्रकल्पाला १९९७ मध्ये प्रथम प्रशासकीय मान्यता मिळाली होती, परंतु निधीच्या कमतरतेमुळे कामे थांबली होती. २०१९ मध्ये दुसरी पुनरीक्षित प्रशासकीय मान्यता (₹१,३३,०७४ कोटी) मिळाली, तर २०२२ मध्ये प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेत (PMKSY) समावेश करताना ₹६४७.६९ कोटी मंजूर झाले. या निधीमुळे जिहे-कठापूर बॅरेज, मुख्य पंप हाऊस, वर्धनगड आणि आंधळी बोगद्यांची कामे पूर्ण झाली असून, सध्या १४,६०० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळत आहे. नीर लिफ्ट सिंचन योजना क्रमांक १ आणि २ तसेच आंधळी लिफ्ट सिंचन योजनेची कामे सध्या प्रगतीपथावर असून, ती मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होण्याचे नियोजन आहे. ११ ऑक्टोबर २०२४ च्या ठरावानुसार प्रकल्पाला तिसरी पुनरीक्षित प्रशासकीय मान्यता मिळाली असून, टप्पा-दोनसह एकूण खर्च ₹५,४०९.७२ कोटी आहे. हा प्रकल्प मार्च २०२९ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. गोरे यांनी ढउ मंजुरीसाठी तातडीने कार्यवाही करण्याची विनंती केली. या योजनेमुळे सातारा जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असे विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**ग्रामीण रस्ते विकासासाठी शिवराज सिंह चौहान यांच्याशी भेट**

या दौऱ्या दरम्यान मंत्री गोरे यांनी केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांची भेट घेऊन प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY) टप्पा-४ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निवेदन सादर केले. यापूर्वी १७ एप्रिल २०२४ रोजीही त्यांनी चौहान यांच्याशी याच विषयावर चर्चा केली होती. या निवेदनात महाराष्ट्रातील ग्रामीण रस्ते विकासाला गती देण्यासाठी महत्त्वाच्या सूचना मांडण्यात आल्या. PMGSY टप्पा-३ अंतर्गत महाराष्ट्रासाठी २,००९ रस्त्यांना मंजूरी मिळाली असून, त्यांची एकूण लांबी ६,४५५ किलोमीटर आहे. टप्पा-४ अंतर्गत सामान्य क्षेत्रातील ५०० पेक्षा जास्त आणि दुर्गम क्षेत्रातील २५० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांना बारमाही रस्त्यांनी जोडण्याचे उद्दिष्ट आहे. सध्याचे पात्रता निकष २०११ च्या जनगणनेवर आधारित असून, गेल्या १२ वर्षांत लोकसंख्येत झालेली वाढ लक्षात घेता, गोरे यांनी जल जीवन मिशनप्रमाणे वर्तमान लोकसंख्येवर आधारित निकष लागू करण्याची मागणी केली. याशिवाय, २५० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या सर्वसाधारण वसाहतींना पात्र ठरविण्याची आणि टप्पा-१ अंतर्गत बांधलेले १०,००० किलोमीटर रस्ते, जे जड वाहतुकीमुळे खराब झाले आहेत, त्यांच्या दुरुस्ती व उन्नयनासाठी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती त्यांनी केली. ग्रामीण रस्ते हे विकासाचा पाया आहे. केंद्र सरकारच्या सहकार्याने या सूचना अमलात आल्यास महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचा कायापालट होईल, असे गोरे यांनी सांगितले. चौहान यांनी या सूचनांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले.

यासह केंद्रीय राज्य विमानन मंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेतली. सोलापूर येथून मुंबई ते पुणे विमान सेवा सुरळीत व्हावी, यासंदर्भात चर्चा केली. तसेच १० ऑक्टोंबर २० २४ राज्य शासनाच्या शासन निर्णयाप्रमाणे राज्य शासन प्रवाशांना सुविधा देणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्र्यांना दिली.

---

## सिटी सर्वेचे कार्यालय नवीन प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित करा : विष्णूदादा भोसले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : जुन्या तहसिलदार कार्यालयात सुरु असलेले सिटी सर्वेचे कार्यालय नवीन प्रशासकीय कार्यालयात स्थलांतरित करा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले यांनी, तालुका उप अधिक्षक भूमी अभिलेख एस.आर. गौड मॅडम तालुका पुरंदर यांना लेखी निवेदन देऊन केली.

यावेळी विष्णूदादा भोसले यांच्या समवेत अखिल भारतीय कोल्हाटी डोंबारी संघटनेचे राज्याचे सरचिटणीस मनोहर ताथवडकर पुरोगामी संघर्ष परिषदेचे राज्याचे युवक अध्यक्ष मनोज भिसे, किशोर आढागळे,सचिन भोंडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

उप अधिक्षक भूमी अभिलेख पुरंदर यांना दिलेल्या निवेदनाच्या प्रति , पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, भूमी अभिलेख अधिक्षक पुणे जिल्हा, व पुरंदरचे तहसिलदार विक्रम राजपूत यांना दिल्या आहेत, प्रशासकीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नागरीकांना एकाचं ठिकाणी सर्व शासकीय कार्यालयातील कामे करणे सोयीचे व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने सासवड येथे भव्य प्रशासकीय इमारत बांधली आहे, या इमारतीत उपविभागीय अधिकारी तथा प्रांत,



पुरंदर, यांचे कार्यालय तहसिलदार कार्यालय, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, व दुय्यम निबंधक तथा सब रजिस्ट्रार तालुका पुरंदर यांचे कार्यालय नवीन प्रशासकीय इमारतीत सुरु करण्यात आले आहे, परंतु सिटी सर्वेचे कार्यालय अद्याप नवीन प्रशासकीय इमारतीत सुरु करण्यात आले नाही ते तात्काळ सुरु करण्यात यावी अशी मागणी रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या वतीने विष्णूदादा भोसले यांनी केली आहे. याबाबत तात्काळ सार्वजनिक विभागाला पत्रव्यवहार करुन सिटी सर्व्हेचे कार्यालय नवीन प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित करु असे आश्वासन तालुका भूमी अभिलेख उप अधिक्षक एस आर गौड मॅडम यांनी विष्णूदादा भोसले यांना दिले आहे.

---

## पडघा परिसरातील नदी जवळील गावांना सतर्कतेचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : ठाणे जिल्ह्यात मुसळधार पावसाने २४ तासांपासून धुमाकूळ घातलं यंदाच्या वर्षातील विक्रमी पावसाची नोंद केली. यामुळे जिल्ह्यातील अनेक नद्या ओढ्याना पूर आला आहे. तर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनेक गावपाड्यांना जोडणारे पूल पुराच्या पाण्याखाली जाऊन ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.



भातसा धरण विसर्ग सूचना पत्राचे अनुषंगाने, भातसा धरणांमधून भातसा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग करण्यात येणार असल्याने, भातसा नदीपात्राच्या पूर प्रवण क्षेत्रातील . वांद्रे, सौर,कळंबोली, कांदळी तर्फे राहूर, कोशिंबी, भादाने (जुपाडा, बाटलीपाडा), चिराडपाडा (आदिवासी वाडी) खडवली नदी जवळील परिसरातील मातोश्री वृद्धाश्रम, भादाणे ग्रामपंचायत हद्दीतील बाटलीपाडा, जुपापाडा गावातील नागरिकांना सतर्कतेचे इशारा जिल्हा प्रशासनकडून देण्यात आला आहे. तर खडवली पूल पाण्याखाली गेल्याने व रेल्वे सेवा ठप्प झाल्याने पावसाच्या काळात नागरीकांना उपचारासाठी तालुक्याच्या ठिकाणी जायचे कसे? हा मोठा संकट परिसरातील नागरिकांच्या समोर उभा राहीला आहे.

भादाने ग्रामपंचायत हद्दीतील जूपाडा बाटली पाडा (गवते पाडा ) येथे सतर्कतेचा इशारा दिला आहे . सदर ठिकाणी ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी आशा सेविका ,आरोग्य विभागाची टीम. तलाठी व त्यांचे कर्मचारी भादाणे येथील युवक मंडळ यांनी बचाव कार्यास सहकार्य केले.

> **भादाणे ग्रामपंचायत हद्दीतील बाटली पाडा येथील ७ कुटुंबाना भादाणे जिल्हा परिषद शाळा येथे स्थलानंस्थतरीत केले आहे.११ घरात ३ फूट पाणी भरलेले सर्व कुटूंब सुखरूप सुरक्षास्थळी हलविण्यात आलेली आहेत.**
> **- भादाणे ग्रामपंचायत अधिकारी मधुकर जाधव**

तर पडघा पोलीस स्टेशनच्या माध्यमातून खडवली, आतकोली, वालकस, कोशिंबी, पिसे धरण, लोणाड चौधर पाडा, गांधारी ब्रिज येथे पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. गेल्या तीन दिवसापासून मुसळधार पावसामूळे जिल्ह्यातील सर्वच शहरातील सखल भागात पाणी साचल्याने शेकडो नागरिकांच्या घरात पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे हाल झाले आहे. मुसलधार पावसामुळे शहरी भागासह ग्रामीण भागातील बहुतांश सखल भाग जलमय झाल्याने हजारो नागरिकांच्या दुकानासह घरातील संसरा उपयोगी साहित्याचे नुकसान



झाले आहे. भिवंडी शहर ग्रामीण भागातही कोसळधार पावसाने हाहाकार उडाला आहे. जिल्ह्यात सर्वच नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून नदी खाडी, ओढे या लगतच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना सतर्कतेचे इशारा जिल्हा प्रशासनकडून देण्यात आला आहे.

---

## एस.टी. महामंडळात शिकाऊ उमेदवारांकरीता ३२० जागेची भरती ३१ ऑगस्ट पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सोलापूर विभागात सन २०२५-२०२६ करीता आय.टी.आय उत्तीर्ण उमेदवारांसाठी एकूण ३२० जागेची जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. पात्र उमेदवारांनी सदर ३२० जागेकरीता apprenticeship-india.gov.in या संकेतस्थळावर अर्ज सादर करावे. अर्ज सादर करणेचा अंतिम दि ३१ ऑगस्ट २०२५ असा आहे. कागदपत्र तपासणीचा दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ असा आहे.याबाबत अधिक माहितीकरीता विभागीय कार्यालय, जी.एम.चौक, बुधवार पेठ, सोलापूर ४१३३००२ येथे संपर्क साधणेबाबत श्री. अमोल चं. गोंजारी, विभाग नियंत्रक, सोलापूर यांनी कळविले आहे.

---

## पंढरपूर सिंहगड महाविद्यालयामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी विभागामध्ये परदेशी उच्च शिक्षणाच्या संधीवर मार्गदर्शनपर व्याख्यान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सिंहगड महाविद्यालयामध्ये प्रदेशात उच्च शिक्षणासाठी उपलब्ध विविध संधी यावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाविद्यालयाची प्राचार्य डॉ. के. जे. कारंडे यांनी दिली.

या व्याख्यानामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून अशी रज ओव्हरसीज एज्युकेशनचे डायरेक्टर मा. अमोल उन्होने उपस्थित होते. त्यांनी राज्य शासन व केंद्र शासनाकडून प्रदेशात उच्च शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या विविध शिष्यवृत्ती तसेच कमी खर्चात विविध देशांमध्ये उच्च शिक्षण घेण्याच्या संधी बाबत विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले. अमोल उन्होने यांनी विद्यार्थ्यांना प्रदेशात उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या विविध पात्रता परीक्षा व त्यांचे स्वरूप आणि तयारी कशी करावी याबाबतची सखोल माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी मार्गदर्शन करताना प्रोत्साहित केले.

या कार्यक्रमात तृतीय वर्षातील सुमारे १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला या उपक्रमाचे आयोजन सिंहगड महाविद्यालयातील आय.आय. सी. एन. डी. एल. रो ट्रॅक्ट



क्लब आणि अशी राज पोहेचलीस एज्युकेशन कन्सल्टंट प्रा लिमिटेड यांच्या विद्यमाने करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ट्रेडिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉक्टर समीर कटेकर, प्रा अजित कारंडे, प्रा अभिजित सव्वाशे, प्रा नागनाथ खंडेकर, प्रा अमोल घोडसे, प्रा पूनम गवळी, तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि यांनी सहकार्य केले आहे.

---


**पंढरपूर नगरपालिका प्रशासन सज्ज; मुख्याधिकारी महेश रोकडे यांची माहिती**

## भीमा नदीत एक लाख ४६ हजाराचा विसर्ग, नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी: तहसीलदार सचिन लंगोटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : उजनी व वीर धरणाच्या पांडू क्षेत्रामधील सततच्या पावसामुळे धरणाच्या पाणी पातळी मध्ये सातत्याने वाढ होत आहे. धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी उजनी धरणातून ९१,६२१ तर वीर धरणातून ५४,७६० क्युसेस असा एकूण एक लाख ४६ हजार ३६० क्युसेस इतका विसर्ग सोडण्यात आल्याने नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी असे आव्हान तहसीलदार सचिन लंगोटे यांनी केले आहे.

आज दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी तीन वाजता संगम येथून एक लाख वीस हजार ६९५ क्यू सी एस पाणी वाहत आहे तर चंद्रभागा नदीपात्रातून ६००००२४७ क्युसीएस पाणी वाहत आहे उजनी व वीर धरणातून घाटमाथ्यामधील पावसाच्या प्रमाणामुळे धरणाजी येणाऱ्या पावसाच्या अनुसार निसर्गामध्ये अजून वाढ होण्याची शक्यता आहे त्या अनुषंगाने नदीपत्राला पूर परिस्थिती निर्माण होऊन सकल भागातील नागरी वस्तीमध्ये पुराचे पाणी शिरण्याची शक्यता आहे तसेच पाणी पातळी वाढत असल्याने पंढरपूर तालुक्यातील आठ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे पाण्याखाली जाण्याची शक्यता असल्याचे सुरक्षितेच्या दृष्टीने निरा व भीमा नदीकाठच्या नागरिकांना सतरता बाळगावी.



जेव्हा व नीरा नदी मधून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू झालेला आहे त्यामुळे नदीतील कोल्हापूर पद्धतीचे सर्व बंधारे पाण्याखाली जाणार आहेत बंधारे पाण्याखाली गेल्याने बेरिकेट लावून वाहतुकीसाठी बंद करावेत असा सूचना तलाठी, ग्रामसेवक ,पोलीस पाटील, यांना दिलेले आहेत.

पंढरपूर नगरपालिका प्रशासन सज्ज मुख्याधिकारी महेश रोकडे यांची माहिती.

उजनी व वीर धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी भीमा नदीला उजनीतून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू झालेला आहे त्यामुळे शहरातील चंद्रभागा नदीकाठच्या भागातील नागरिकांनी सुरक्षितेबाबत दक्षता घ्यावी तसेच पूर परिस्थितीत आवश्यक उपाययोजना करण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असलेली माहिती मुख्य अधिकारी महेश रोकडे यांनी दिली आहे.

तसेच नगरपालिका प्रशासनामार्फत उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे रायगड भवन येथे एक हजार नागरिकांना राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच संबंधित होणाऱ्या नागरिकांच्या जीवनावचक वस्तू नेण्यासाठी नगरपालिका अतिक्रमण विवाह मार्फत वाहनांची व्यवस्था करण्यात आली असून स्थलांतरित करण्यात येणारे नागरिकांना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती व स्वयंसेवी संस्थेमार्फत भोजन व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी रोकडे यांनी सांगितले.

---

## २३ ऑगस्ट रोजी माजी मंत्री महादेव जानकर शिंदी, साखरखेर्डा परिसरात करणार पीक पाहणी दौरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर हे अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करण्याकरता २३ ऑगस्ट रोजी शनिवारला सायंकाळी ४:३० वाजता, साखरखेर्डा, व शिंदी या गावी येणार आहेत, १५ ऑगस्ट रोजी नातेवृष्टीमुळे शिंदी येथील शेती पिकांचे घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. तहसीलदार अजित दिवटे, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, माजी मंत्री डॉक्टर राजेंद्रजी शिंगणे, शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सुद्धा शिंदी येथे जाऊन पीक पाहणी केली व शेतकऱ्यांना धीर दिला.

आता माजी मंत्री महादेव जानकर हे पिक पाहणी करून शेतकऱ्यांना आधार देणार आहेत. अतिवृष्टीमुळे साखरखेर्डा परिसरातील पीक जमिनी खरडून गेले आहेत आता कुठल्याही प्रकारचे सोयाबीन पीक येणे शक्य नाही हे खूप मोठे शेतकऱ्यावर अस्मानी संकट येऊन ठेवले आहे त्यामुळे ओला दुष्काळ जाहीर करून तातडीने मदत देण्याची मागणी सुद्धा आता राजकीय पक्षाकडून होऊ लागली आहे. महादेव जानकर यांचा साखरखेर्डा परिसरामध्ये पहिलाच दौरा असून या दौऱ्याला महत्त्व प्राप्त झाली आहे अशी माहिती राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉक्टर तोफिक शेख यांनी सांगितले आहे, माजी मंत्री जानकर यांच्या समवेत जिल्हा संपर्कप्रमुख अतुल भुसारी जिल्हा अध्यक्ष कारभारी गायकवाड तालुका अध्यक्ष संतोष वनवे हे सुद्धा असणार आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यालगतची एक एकर जागेवर संविधान भवन बांधण्यास मंत्री मंगलप्रभात लोढा यांची मंजुरी

## आमदार देवेंद्र कोठे यांच्या पाठपुराव्याला यश : सोलापुरात मंत्री लोढा यांनी दिलेले शब्द पूर्ण केल्याबद्दल आमदार कोठेंनी मानले आभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यामागील नॉर्थकोट हायस्कूल येथील एक एकर जागेवर संविधान भवन बांधण्यासाठी राज्य सरकारने मंगळवारी मंजुरी दिली. नियमांच्या कचाट्यात अडकलेल्या संविधान भवन उभारणीच्या कामाला परवानगी मिळण्याकरिता पालकमंत्री जयकुमार गोरे यांची शिष्टाई यशस्वी झाली असून आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या पाठपुरावाल्या यश आले आहे.


विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या मागीलबाजूस असणारी महाराष्ट्र राज्य तांत्रिक प्रशाला तथा औद्योगिक शाळा येथील सुमारे एक एकर जागा सोलापूर महानगरपालिकेकडे विनाशुल्क हस्तांतरित करण्यात आली आहे. या जागेवर संविधान भवन बांधण्याचा प्रस्ताव होता. परंतु ही जागा संविधान भवन बांधकामासाठी उपलब्ध करून दिल्यास कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अखत्यारीतील इतर जागेची मागणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आणि जागा हस्तांतरित केल्यास औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या भविष्यातील विस्तारासाठी स्वमालकीची जागा उपलब्ध होणार नाही. त्यामुळे जून २०२३ रोजी च्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन कौशल्य विकास विभागाच्या अखत्यारीतील ही जागा संविधान भवनाकरिता देणे उचित होणार नाही, अशी भूमिका प्रशासनाने घेतली होती. तसा शेरादेखील प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रस्तावावर मारला होता. यानंतर आमदार देवेंद्र कोठे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून कौशल्य विकास विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडे या नियमात सूट देऊन संविधान भवन बांधण्याकरिता परवानगी द्यावी, अशी मागणी केली होती. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शासनाकडे याबाबत आग्रह धरला होता. शासन निर्णयामधील अनुक्रमांक सहा, सात आणि नऊ हे नियम अटीमध्ये अंशत: बदल करून या नियमांना शिथिल करून त्याच जागेवर संविधान भवन बांधण्यासाठी परवानगी मिळावी, अशी मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी केली होती. कौशल्य, विकास, रोजगार व संशोधन मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या सोलापूर दौरा वेळी झालेल्या बैठकीत एक महिन्याच्या आत हा प्रश्न सोडवला जाईल, असे आश्वासन मंत्री श्री. लोढा यांनी आमदार देवेंद्र कोठे यांना दिले होते. यानंतर कौशल्य, विकास, रोजगार व संशोधन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी संविधान भवन बांधकामास मंजुरी देत सोलापुरातील भीमप्रेमींना दिलासा दिला आहे.

### विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करणारा निर्णय

**विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या शेजारी संविधान भवन बांधण्यास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळातील कौशल्य, विकास, रोजगार व संशोधन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मंजुरी देण्याचा निर्णय हा विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करणारा निर्णय आहे. या निर्णयाकरिता कौशल्य, विकास, रोजगार व संशोधन मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे आणि संविधान भवनच्या उभारण्याच्या परवानगीसाठी यशस्वी प्रयत्न करणाऱ्या पालकमंत्री जयकुमार गोरे यांचेही सोलापुरातील तमाम भीमप्रेमींच्यावतीने आभार.**

**– देवेंद्र कोठे, आमदार, शहर मध्य**





# रत्नमाला संपत कापसे यांची निफाड नगरपंचायतच्या दुसऱ्यांदा नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायतच्या नगराध्यक्षपदावर रत्नमाला संपत कापसे यांची बिनविरोध निवड झाली आहे. माजी नगराध्यक्ष शारदा नंदकुमार कापसे यांनी ०६ ऑगस्ट २०२५ रोजी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झाले होते.

या रिक्त जागेसाठी १९ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता निफाड नगरपंचायत सभागृहात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी पिठासीन अधिकारी विशाल नाईकवाडे तहसीलदार, निफाड होते.मुख्याधिकारी धीरज भामरे त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात आली.

सदर निवडणुकीसाठी रत्नमाला संपत कापसे यांचाच एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड घोषित करण्यात आली. या वेळी उप नगराध्यक्ष अनिल कुंदे, नगर सेवक कविता धारराव, शारदा कापसे, विमल जाधव, सुलोचना होळकर, अरुंधती पवार, नयना निकाळे, अलका निकम, साहेबराव बर्डे, संदीप जेऊघाले, किशोर ढेपले, संदीप शिंदे,देवदत्त कापसे, ललित गिते, सोसायटी चेरमन हेमंत धारराव, रमेश जाधव, मुकुंद राजे होळकर, आसिफ पठाण, भाऊसाहेब कापसे, मोहन जाधव, नितीन धारराव, रावसाहेब माळोदे, साहेबराव कापसे, इरफान सय्यद, महेश चोरडिया, मनोज लुक्कड, सुहास सुरळीकर, सचिन खडताळे, स्वप्नील बिनायकीया, दीपक कुंदे, हरीश कर्डीले, सोमनाथ निकम, सागर कर्वे, विक्रम बागडे इ. सर्व उपस्थित होते. या निवडीमुळे नगरपंचायतीमध्ये आनंदाचे वातावरण असून, स्थानिक नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

रत्नमाला कापसे यांचा सामाजिक व राजकीय कार्याचा प्रदीर्घ अनुभव असून, त्या यापूर्वी विविध क्षेत्रांत सक्रिय राहिल्या आहेत. त्यांच्या कार्यकाळात निफाड नगरपंचायतीच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# डॉ. बबन जोगदंड बार्टीत रुजू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : यशदा, पुणे येथील अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांची महाराष्ट्र शासनाने प्रतिनियुक्तीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक या पदावर नियुक्ती केली आहे. त्यांच्याकडे संस्थेतील विस्तार व सेवा या पदाच्या विभाग प्रमुखाची जबाबदारी देण्यात आली आहे. या विभागामार्फत संस्थेची प्रकाशने, प्रचार -प्रसिद्धी त्याचबरोबर समतादूत प्रकल्प असे कामकाज त्यांच्याकडे सोपविण्यात आले.

त्यांनी नुकताच बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांच्या उपस्थितीमध्ये आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस बार्टीचे महासंचालक सुनिल वारे, डॉ बबन जोगदंड यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. महासंचालक यांच्या हस्ते डॉ जोगदंड यांना महामानव हा ग्रंथ तसेच पुष्पगुच्छ भेट देऊन स्वागत केले. मा. महासंचालक यांनी याप्रसंगी बोलताना डॉ बबन जोगदंड यांनी देशातील नामवंत अशा 'यशदा' संस्थेमध्ये महत्वपूर्ण योगदान दिले असुन ते उच्चशिक्षित दोन पीएचडी धारक आहेत. त्यांचा उच्चपदस्थ अधिकारी व तळागाळातील जनतेपर्यंत व्यापक जनसंपर्क असून पत्रकार म्हणूनही काही वर्ष त्यांनी काम केले आहे. बार्टी संस्थेच्या विविध योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ते महत्वपूर्ण काम करतील, असा आशावाद व्यक्त करुन त्यांचे बार्टीत स्वागत केले.

याप्रसंगी निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, स्नेहल भोसले, वषाली शिंदे, यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. डॉ. बबन जोगदंड यांनी पत्रकारिता व लोकप्रशासन या विषयात पीएचडी केली असून त्यांनी आतापर्यंत पंधरा विषयात पदव्या व १० विषयात प्रमाणपत्र, डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत. ते यशदाच्या 'यशमंथन, या मासिकाचे संपादकही होते. त्यांनी अनेक पुस्तकांचे संपादन,लेखन केले आहे. त्याचबरोबर ते चांगले वक्ते, लेखक, अभ्यासक व सूत्रसंचालक आहेत. शासनाचे डॉ. आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य व बालभारतीचे सदस्यही आहेत. विद्यापीठाच्या अनेक अभ्यासक्रम मंडळावरही त्यांनी काम केले आहे. सूत्रसंचलन रामदास लोखंडे यांनी केले तर आभार सुमेध थोरात यांनी मानले.




# मानवतावादी दृष्टिकोनातून काम करण्याची आवश्यकता : प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : १९ ऑगस्ट हा दिवस जागतिक मानवतावादी दिवस म्हणून मानला जातो. जगभरातील मानवतावाद्यांचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. गरजू लोकांना योग्यवेळी योग्य ते सहाय्य मिळालं पाहिजे हा या दिवसाचा खरा संदेश आहे. मानवता हे आपल्या जीवनाचे मूलभूत मूल्य आहे. संकटाच्या वेळी जात, धर्म, पंथ, भाषा या पलीकडे पाहून माणुसकीच्या नात्याने एकमेकांना मदत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, भारतासारख्या बहुजातीय देशात अशा काळात सामाजिक सलोखा व सेवा भाव आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बहुभाषिक, अनेक जाती व धर्माचे लोक राहत असलेल्या या देशात आपत्ती व्यवस्थापनाच्या काळात मानवतावादी दृष्टिकोनातून काम करण्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेज बोरामणीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा संचलित स्प्रिंट फोर ह्युमॅनिटेरियन प्रकल्प अंतर्गत जागतिक मानवतावादी दिनानिमित्त बोरामणी गावात आयोजित आपत्ती व्यवस्थापन पुनर्वसन कार्यावेळेस दिल्या जाणाऱ्या मिनिमम इनिशियल सर्विस ऑफ पॅकेज अर्थात प्रजनन आरोग्याच्या सेवा सुविधांविषयी जनजागृती व्हावी यासाठी पोस्टर प्रदर्शन, हिमोग्लोबिन तपासणी, रक्तगट तपासणी, शुगर तपासणी, सामान्य आरोग्य तपासणी व औषधोपचार, गरोदर व स्तनदा महिलांना प्रोटीन पावडरचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याच्या उद्घाटनाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

मानवतावादी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र शासन संचलित सखी वन स्टॉप सेंटर, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्र व सोलापूर कॅन्सर सोसायटी यांच्या वतीनेही पोस्टर प्रदर्शनात सक्रिय सहभाग नोंदविण्यात आला होता.

यावेळी व्यासपीठावर बोरामणीगावच्या सरपंच अरुणा साळुंखे, राज साळुंखे, ग्राम पंचायत अधिकारी संदीप दराडे, उपसरपंच सुनीता गाडेकर, बोरामणी ग्रामपंचायत सदस्य सैपनसाब फुलारी, एस. व्ही. सी. एस. हायस्कूल बोरामणीचे मुख्याध्यापक एम.आर.अतनुरे, पर्यवेक्षक शिवप्पा बिराजदार, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्र सोलापूरचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट, विठ्ठल मंदिरचे पुजारी रमेश मोहिते, सखी वन स्टॉप सेंटरच्या समुपदेशिका सुजाता बत्तुल, केसवर्कर स्वाती आलूवालिया, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक, मंद्रूप ग्रामीण रुग्णालय, आय. सी. टी. सी. सेंटरचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ बाळकृष्ण बेंडकाळे व समुपदेशक शितल सूर्यवंशी आदी उपस्तिथ होते.

एम. जे. प्रथम मानव-सेवा संस्था महाराष्ट्रचे अध्यक्ष मोहन तलकोकुल यांना समाजातील दुबळ्या घटकांसाठी करीत असलेल्या समाज सेवेबद्दल तर मुळेगाव तांडा उपकेंद्राच्या अशा वर्कर व फॅमिली प्लॅनिंगच्या नरोत्तम सेक्सरियार फाउंडेशन संचलित मुखाचा व गर्भाशयाचा कॅन्सर जनजागृती प्रकल्पाच्या भूतपूर्व कर्मचारी रेखा राठोड यांनी सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्यावतीने आयोजित १४ दिवसाचे आपदामित्र प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल बोरामणीगावच्या सरपंच अरुणा साळुंखे यांच्या हस्ते शाल व बुके देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय समारोपात डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी स्प्रिंट फोर मानवतावादी प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या शासकीय, निमशासकीय अधिकारी व कर्मचारी, आरोग्य सेविका, वैद्यकीय अधिकारी, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, आशा वर्कर यांच्याकरिता विविध विषयांवर आयोजित प्रशिक्षण शिबिरांविषयी व उपक्रमांविषयी माहिती दिली.

यावेळी आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात २४० गावकऱ्यांनी सहभाग नोंदविला तर १० गरोदर व स्तनदा महिलांना प्रोटीन पावडरचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार कल्पना गडगडे यांनी मानले.

## चंद्रभागा नदीपात्रात बोट व जीवरक्षकांची नियुक्ती

## प्र. कार्यकारी अधिकारी सचिन इथापे यांनी दिली माहिती

# पंढपुरात पूर परिस्थिती : मंदिर समितीकडून स्थलांतरित कुटुंबियांना फुड पॅकेटचे वाटप : मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : वीर आणि उजनी धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सोडण्यात आल्याने चंद्रभागा नदीच्या पाणी पातळीत वाढ झालेली आहे. प्रशासनाकडून चंद्रभागा नदी काठच्या नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले असून, स्थलांतरीत नागरिकांना श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती मार्फत फुड पॅकेट वाटप करण्यात येत आहेत. तसेच चंद्रभागा नदीपात्रात जीवरक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

सद्यस्थितीत, पंढरपूर शहर व परिसरात पूरस्थिती निर्माण झाली आहे. चंद्रभागा नदीच्या पातळीने धोक्याने पातळी ओलांडली असल्याने स्थानिक प्रशासनामार्फत अनेक घरे स्थलांतरित करण्यात आली आहेत. सध्या उद्भवलेली पूरजन्य परिस्थिती हटवण्यासाठी व बचाव कार्य करण्यासाठी तसेच मानवतावादी भूमिकेतून व सामाजिक उत्तरदायित्व म्हणून मंदिरे समिती मार्फत बाधित कुटुंबियांना फुड पॅकेट वाटप करण्यात आली. त्यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत व विभाग प्रमुख विनोद पाटील उपस्थित होते.

याशिवाय, चंद्रभागा नदीपात्रात भाविकांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने जीवरक्षक नियुक्त करण्यात आलेले आहेत. तसेच स्थानिक प्रशासनामार्फत बोट उपलब्ध करून देण्यात आली असून, या बोटीस मंदिर समिती मार्फत इंधन व इतर अनुषंगीक सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात असल्याची माहिती प्र. कार्यकारी अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.



# समाजातील गुणवंत विद्यार्थी व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : आरक्षण धोरणाचे जनक छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी २६ जुलै १९०२ रोजी आरक्षणाची ऐतिहासिक सुरुवात केली होती. तसेच साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीचे औचित्य साधून गुरु रविदास सत्यशोधक समाज व रविदास सत्यशोधक मासिकातर्फे समाजातील गुणवंत विद्यार्थी व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा सोहळा रविवार, दि. २४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राच्या सभागृहात होणार असून, उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरु मा. डॉ. वाल्मीक सरवदे यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान चळवळीचे संस्थापक अध्यक्ष सत्यशोधक प्रबोधनकार ॲड. डॉ. पी. एस. चंगोले भूषवणार असून, माध्य. व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळाचे चेअरमन अनिल साबळे हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून से.नि. पोलीस आयुक्त बालाजी सोनटक्के, से.नि. आरोग्य उपसंचालक डॉ. शिवाजीराव धनवले, पोस्टमास्तर मिराताई वासुदेवराव घोपे यांच्यासह सुषमा गायकवाड, पुष्पा दुतोंडे, लताबाई बावस्कर, शोभा लोखंडे, दुर्गा गतखने, सुनिता डोंगरे व ग.मा. पिंजरकर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात मराठवाड्यातील प्रख्यात शाहीर सुरेश जाधव यांचा पोवाडा व क्रांतिकारी बीत गायनाचा विशेष कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजन समितीचे प्रमुख सी. एम. रमणे, संतोषराव लोखंडे, प्रा. जी. के. काटकर, बी. सी. वाडेकर, उषाताई वाढई, डी. वाय. ठोंबरे, अशोक वाढई, अशोक डांगे, शंकरराव बावस्कर, रमेश डोंगरे, हिरालाल काठोटे, बी. जी. तुपे, महादेव डांबरे, ब्रिजलाल बन्सवाल, प्रमोद दुतोंडे, अभय दांडेकर, कमलबाई पंवार, जगदीश बेदवे, गजानन गव्हाळे, चंद्रकांत कांबळे आदींनी केले आहे.